# बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी काय संपता संपेना; अनेक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यास अजूनही टाळाटाळ


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १८१ ■ गुरुवार दि.२० मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 181 ■ Thursday Dt. 20 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4




# वाल्मिक कराडसह आठवले गुर्जर खान गँगनंतर आता आष्टीच्या भोसले गँगवर मकोका

## बीड पोलिसांची कारवाई; आणखी एक टोळी कारवाईच्या रडारवर?

## पहिल्यांदाच मकोकामध्ये महिलांचा आरोपी म्हणून समावेश




बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारीच्या घटनांवर पायबंद घालण्याच्या दृष्टीने पोलिस दलाने कडक उपाययोजना हाती घेतल्या आहेत. संतोष देशमुख हत्या व खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडच्या टोळीवर मकोका लावल्यानंतर आणखी एका सहा जणांच्या गुन्हेगारी टोळीवर मकोका लावण्यात आला आहे. वाल्मीक कराड, सुदर्शन घुले, बीडची आठवले गँग, यानंतर आता आष्टीच्या भोसले गँगवर मकोका लावण्यात आला आहे. मागील दोन महिन्यांत अशा प्रकारच्या तीन कारवाया केल्याने गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहे. विशेष म्हणजे आतापर्यंत पहिल्यांदाच मकोकामध्ये महिलांचा आरोपी म्हणून समावेश झाला आहे. पोलिस अधीक्षक नवनीत काँवत हे गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ ठरत आहेत.

■ पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ

■ जिल्ह्यातील एलसीबीसह २८ पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी बदलणे गरजेचे?

■ वाल्मीक कराडच्या मर्जीतले पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचारी नेत्यांच्या व्हाट्सअप कॉल वरती बोलून गुन्हेगारांना सहकार्य?

■ पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी याची सखोल चौकशी करून पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे व्हाट्सअप कॉल चेक करणे गरजेचे?

आष्टी तालुक्यातील हातोळण येथील अजिनाथ विलास भोसले, भरत विलास भोलसे, या दोन सख्ख्या भावांचा खून करून कृष्णा भोसले याला गंभीर जखमी केल्याची घटना १६ जानेवारी २०२५ रोजी वाहिरा येथे घडली होती. याप्रकरणी अजिनाथची पत्नी चिब्बा (वय ३०) हिच्या फिर्यादीवरून अंभोरा ठाण्यात ९ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी यातील सहा आरोपींना अटकही केली होती. त्यानंतर अंभोरा पोलिसांनी या सर्व आरोपींच्या गुन्ह्यांची माहिती काढून मकोकाचा प्रस्ताव तयार केला. १० मार्च रोजी हा प्रस्ताव पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांच्याकडे आला. त्यांनी दुसऱ्याच दिवशी तो शिफारशीसह छत्रपती संभाजीनगरचे विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांना पाठविला. त्यांनी १९ मार्च रोजी याला मंजुरी दिली आहे. त्याप्रमाणे आता पहिल्या खुनाच्या गुन्ह्यात मकोकाचे कलम वाढविण्यात आले आहे. याचा पुढील तपास हा आष्टीचे उपविभागीय पोलिस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे हे करत आहेत.

### आणखी एक टोळी निशाण्यावर?

पोलिसांनी २०२५ या वर्षात तीन टोळ्यांवर मकोका लावला आहे. आणखी एक टोळी पोलिसांच्या निशाण्यावर आहे. त्यांची सर्व कुंडली सीसीटीएनएस विभागातून काढण्यात आली आहे. त्यानुसार प्रस्ताव तयार करून लवकरच त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

### यांनी केली कारवाई

पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मंगेश साळवे, मुकेश एकशिंगे, केदार, सपोउपनि अभिमन्यू औताडे, नीलेश ठाकूर, बिभीषण चव्हाण आदींनी केली आहे.



### अशी आहेत आरोपींची नावे

दीपक ऊर्फ सलीम नारायण भोसले (वय ३५, रा. वाहिरा, ता. आष्टी), सोमीनाथ ऊर्फ नाज्या दिलीप काळे, (वय ३५, रा. घु. पिंपरी, ता. आष्टी), मुद्दसर मन्सूर पठाण (वय ३८, रा. कानडी खुर्द, ता. आष्टी), सोनी ऊर्फ अनिता गोरख भोसले (वय ४०), शशिकला दीपक भोसले (वय ३५) व संध्या कोहिनूर भोसले (वय २१, सर्व रा. वाहिरा, ता. आष्टी), असे सहा आरोपी अटक आहेत. आणखी तीन आरोपी फरार आहेत. त्यांचा शोध पोलिस घेत आहेत.



“ बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी काय संपता संपत नाही. जिल्ह्यातील कायदा व संस्था आणि गुन्हेगारीच्या घटनांवर पायबंद घालण्यासाठी जिल्ह्यातील एलसीबीसह २८ पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी बदलणे हे गरजेचे आहे. कारण हे पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचारी वाल्मीक कराडच्या मर्जीतले आहेत. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी बीड पोलिसांना पुरावे सादर केले आहेत. वाल्मीक कराडच्या मर्जीत असलेले पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचारी अनेक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यास अजूनही टाळाटाळच करत असल्याचे सांगितले जात आहे. तसेच वाल्मीक कराडचे खातेदार असलेले पोलीस अधिकारी कर्मचारी नेत्यांच्या व्हाट्सअप कॉल वरती बोलून गुन्हेगारांना आजही सहकार्य करतात. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी याची सखोल चौकशी करून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे व्हाट्सअप कॉल चेक करणे गरजेचे आहे. तसेच ते चेक करण्याची मागणी होत आहे.

# रामराज्यात चकलांबा येथील श्रीराम देवस्थानाची जमीनही सुरक्षित नाही

## चकलांबा ग्रामपंचायतीच्या अतिक्रमणाचा प्रश्न आ.विजयसिंह पंडित यांनी सभागृहात मांडला

गेवराई | प्रतिनिधी

अतिक्रमण दूर करण्याचे काम ग्रामपंचायत करते मात्र चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण करून कचरा डेपोचे काम सुरू केले आहे. महायुतीच्या काळात रामराज्य सुरू असल्याचे लोक सांगतात मात्र या राम राज्यात श्रीराम देवस्थानाची जमीन सुरक्षित नाही अशी खंत आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत व्यक्त केली आहे. गेवराई तालुक्यात सुरू असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांची चौकशी करण्यासाठी एसआयटी नेमण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत सहभागी होताना आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत बोलत होते.



जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहार आणि चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमिनीवर केलेले कचरा डेपोचे अतिक्रमण या दोन विषयाला आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत वाचा फोडली. यावेळी बोलताना आमदार विजयसिंह पंडित म्हणाले की, जल जीवन मिशन अंतर्गत गेवराई तालुक्यातील १९२ गावांसाठी १७२ कोटी रुपये किमतीच्या नळ पाणीपुरवठा योजनांची कामे मंजूर आहेत. विहित मुदतीत त एकाही योजनेचे काम पूर्ण झालेले नाही. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू होत आहेत. १९२ नावांपैकी १० टक्के गावात सुद्धा सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. वॅपकॉस प्रा. लि. सारख्या तंत्रिक सेवा पुरवठादार कंपनी आणि संबंधित विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने शासनाचा कोट्यावधी रुपयांचा निधी अक्षरशः वाया गेला आहे.

प्रगती कंट्रक्शन सारख्या कंत्राटदाराने कोट्यावधी रुपयांची देयके उचलून पोबारा केला आहे. त्यामुळे या सर्व योजनांच्या कामाची चौकशी करण्यासाठी एसआयटी गठीत करण्यासाठी मागणी आमदार विजयसिंह पंडित यांनी केली आहे. तसेच चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमिनीवर केलेल्या अतिक्रमणाबाबत बोलताना आमदार विजयसिंह पंडित म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापनासाठी चकलांबा ग्रामपंचायतीला निधी मंजूर झाला. मात्र ग्रामपंचायत ने श्रीराम देवस्थान या नोंदणीकृत ट्रस्ट मालकीच्या गट क्रमांक ५७१ मधील जमिनीवर कचरा डेपो चे काम सुरू केले आहे. अधिकारी-अधिकारी अशी मिलीभगत सुरू असल्यामुळे आता श्रीराम सुद्धा चकलांबा सारख्या गावात सुरक्षित नाहीत. महायुतीच्या काळात रामराज्य सुरू असल्याचे काही लोक सांगतात. मात्र यात सरकारच्या काळात श्रीराम देवस्थानाची जमीन आपण वाचवू शकतो का? असा असावा नाही आमदार विजयसिंह पंडित यांनी उपस्थित केला आहे.



## अनुसुचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करा

माजलगाव | प्रतिनिधी

अनुसुचित जातीतील आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करा, क्रांतीविर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या शासनाने स्विकारलेल्या शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करा अशी मागणी तहसिलदारांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज दि. २० मार्च रोजी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, १ ऑगस्ट २०२४ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जातीतील आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचे अधिकार राज्य शासनाला असल्याचा सर्वोच्च निकाल दिलेला आहे. त्यानुसार शासनाने सेवानिवृत्त न्यायमुर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी गठीत केली आहे. बदर समितीने दोन महिण्यात अहवाल सादर करावा, आरक्षण उपवर्गीकरण होत नाही तोपर्यंत जुन मध्ये होणारी नोकर भरती करू नये, बदर समितीने अनुसूचित जातीतील ५९ जातींची आजची लोकसंख्या गृहीत धरून वर्गीकरण करावे, २० वर्षे झाले तरी शासनाने स्वीकारलेल्या ६८ शिफारशींपैकी एकाही शिफारशीची अंमलबजावणी केली नाही शासनाने बजेटसह तरतुद करून शिफारशींची अंमलबजावणी करावी २० एप्रिल २०२५ पर्यंत मागण्यांची अंमलबजावणी करा अन्यथा दि. २० मे पासुन आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर उपसरपंच अनिल राधे कांबळे यांची स्वाक्षरी असुन निवेदन देतांना बिभिषण साबळे, कारभारी कांबळे, दत्ता कांबळे, आकाश लोखंडे, सचिन कांबळे, प्रशांत जाधव, प्रदिप कांबळे, स्वप्नील उमाप, बाळु कांबळे, करण जाधव, सागर कांबळे, सुहास क्षिरसागर, गोविंद आडागळे, सुमित कांबळे यांचेसह अनिलराधे मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## वयोवृद्ध विधवा महिलेच्या अंगावर रिक्षा घालून हनमार करणाऱ्या आरोपीस तत्काळ अटक करा

## एस.पी.च्या दालनासमोर आंदोलन करू : सोनवणे

बीड | प्रतिनिधी

खांडे पारगाव येथे स्वाती संदेश डोळस या महिलेच्या आईच्या अंगावर रिक्षा का घातला. वयोवृद्ध आजीच्या गुडघ्याला मार लागलेला आहे, म्हणून विचारणा केली असता रात्री ८ वाजता भांडण झाले, स्वाती डोळस या विचारायला गेले असता त्यांचे केस धरून खाली पाडून लोखंडी रोडने हनमार केली डोक्यात गज मारला त्यांना पाच टाके पडलेले आहेत पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे तक्रार घेतली नाही. सिविल हॉस्पिटल बीड येथे ते ऍडमिट आहेत. स्वाती डोळस यांना वडील नाहीत भाऊ नाही आई व एक बहीण या व्यतिरिक्त त्यांना सहारा नाही याचा फायदा घेऊन रिक्षा चालकाने दारू पिऊन रिक्षा अंगावर घातला. व जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये त्या थोडक्यात बचावल्या. भाऊ म्हणून आम्ही आजपासून त्यांच्या सदैव सोबत आहोत.

आम्हाला फोन आल्यानंतर आम्ही तात्काळ सिव्हिल हॉस्पिटल बीड या ठिकाणी जाऊन पेशंटची आस्तविकपणे चौकशी केली. ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने डोळस कुटुंबीयांच्या सोबत आम्ही ठामपणे उभा आहोत बीड एसपी स्थानिक पोलीस स्टेशन यांना संघटनेचे वतीने विनंती करतोय तात्काळ ट्रॉसिटी क्ट,३०७ अंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करा. पेशंटची तब्येत सिरीयस आहे डोळ्यावरती खूप सूज आली आणि मार लागलेला आहे सिव्हिल हॉस्पिटल येथील डॉक्टरांना पेशंट कडे लक्ष देण्यास सांगितले. तात्काळ सर्व आरोपींना अटक करा अन्यथा एस पी ऑफीस या ठिकाणी कुटुंबियांना घेऊन व नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष,ऑल इंडिया पँथर सेना, सुंदर वाघमारे, अरविंद सरवदे यांच्या वतीने आंदोलन केले जाईल.

# तीन तरुणांकडून दलित तरुणाला अमानुष मारहाण!

## बीड जिल्ह्यात व्हिडिओ करत मारण्याचे प्रकार वाढले; कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण?

## बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा मुद्दा निर्माण करण्यासाठी हे कृत्य केले जात आहे का? याची सखोल चौकशी करावी!

केज | प्रतिनिधी

होलार समाजाचा अनुसूचित जातीचा कृष्णा साळे दस्तगीरवाडी येथील अल्पवयीन मुलास रिंगण करून तिघांनी मारलं आहे. त्याचा थरारक व्हिडिओ सोशल मीडियावर फिरत आहे. त्याचे पैसे घेतले, मोबाईल हिसकावला गेला. गुन्हा घेण्यास पोलीसांनी विलंब केला हे दुर्दैव आहे. ऍट्रॉसिटी ऍक्टचा गुन्हा का नोंद केला नाही?

बीड पोलिस अधीक्षकांनी तात्काळ दखल घेऊन सर्व आरोपीला अटक करण्याचे आदेश द्यावेत. आरोपींना पोलीस प्रशासनातील काही अधिकारी तर पाठीशी घालत नाहीत ना? असा सवाल स्थानिक लोक विचारत आहेत. तात्काळ आरोपीना अटक करून कायद्याचा जबर धाक दाखवला पाहिजे. व्हिडीओ काढून बीड जिल्ह्यात मारण्याचे प्रकार वाढले आहेत. त्या अनुषंगाने कुणी जाणीवपूर्वक हे करतंय का? यामागे पोलीसांना, पोलीस अधीक्षकांना बदनाम करण्यासाठी, कायदा व सुव्यवस्थेचा मुद्दा निर्माण करण्यासाठी हे कृत्य करतंय का याची सखोल चौकशी करावी. राज्य सरकारने गंभीर्याने दखल घ्यावी. मुख्यमंत्री गृहमंत्री सपसेल फेल झालेले आहेत काय? त्यांच्या कारकीर्दीला चॅलेंज देणाऱ्यांना ते रोखू शकलेले नाहीत काय? त्यामुळे दलितांचे व ईतर मागासवर्गीयांच्ये अस्तित्व धोक्यात आले आहे का? असे अनेक प्रश्न लोकं विचारू लागले आहेत.

### घटना नेमकी काय?

व्हिडीओमध्ये अल्पवयीन तरूणांचं एक टोळकं आणि त्यांच्या गाड्या दिसताय. यामध्ये टोळक्यातले मुलं एका मुलाला खाली पाडून लाथा, बुक्क्यांनी मारतायत. शिव्या देतायत. बाळ्याला कुणी सांगितलं? लाव त्याला फोन आता, सांगतोस का बाळ्याला, बघायची का माझी पावर तुला? नरड्यावर पाय देईल तुझ्या.खल्लास करतो तुला दगड टाकून... अशा धमक्या देत आहेत. यावेळी खाली पडलेला तरूण वेदनांनी विव्हळत राहिला. ज्या तरूणाला मारहाण होतेय, त्याचं नावही समोर आलं आहे.

### आरोपीला पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन करा : दिपक केदार

बीड पोलिसांनी अधीक्षकांनी तात्काळ दखल घ्यावी. सर्व आरोपीला अटक करण्याचे आदेश द्यावेत. आरोपीला पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन करावे. अशीही मागणी दीपक केदार यांनी केली आहे. व्हिडीओ काढून बीड जिल्ह्यात मारण्याचे प्रकार वाढले आहेत. त्या अनुषंगाने कुणी जाणीवपूर्वक हे करतंय का? यामागे पोलीसांना, पोलीस अधीक्षकांना बदनाम करण्यासाठी, कायदा व सुव्यवस्थेचा मुद्दा निर्माण करण्यासाठी हे कृत्य करतंय का याची सखोल चौकशी करावी. राज्य सरकारने गंभीर्याने दखल घ्यावी. मुख्यमंत्री गृहमंत्री सपशेल फेल झालेले आहेत. त्यांच्या कारकीर्दीला चॅलेंज देणाऱ्यांना ते रोखू शकलेले नाहीत. त्यामुळे दलितांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. तात्काळ आरोपीला अटक करण्याची मागणी दीपक केदार यांनी केली आहे.





श्री. गोविंद जाधव
आदर्श पत्रकार पुरस्कार



श्री नरहरी तपकिरे
झिरो टु हिरो उद्योजक पुरस्कार



श्रीम. रंजना जाधव
आदर्श शिक्षक पुरस्कार



श्री.मंगेश भोले
आदर्श समाजरक्षक पुरस्कार



श्री. संतोष पवार
आदर्श समाजसेवक पुरस्कार

## राजर्षी शाहू असोसिएशन व ढगेज् क्लासेसचे आदर्श पुरस्कार जाहीर

अंबाजोगाई | प्रतिनिधी

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी प्रति वर्षाप्रमाणे राजर्षी शाहू मल्टीपर्पज असोसिएशन लातूर व ढगेज् कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या वतीने दिले जाणारे 'आदर्श पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत त्याचे वितरण दि २३ मार्च २०२५ रविवार रोजी प्लास्टिक सर्जन आदरणीय डॉ. विठ्ठलराव लहाने व सुप्रसिद्ध अभिनेते सुनिल गोडबोले यांच्या हस्ते होणार आहे.

**प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांच्या हस्ते रविवारी होणार वितरण**

राजर्षी शाहू मल्टीपर्पज असोसिएशन लातूर व ढगेज् कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आदर्श व्यक्तींना प्रतिवर्षी आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे तसेच ढगेज् कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या संकुलात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण कार्यक्रम मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह येथे करण्यात येणार आहे

आदर्श पुरस्कार वितरण सोहळ्यात आदर्श शिक्षक, समाजरक्षक, उद्योजक, पत्रकार आणि समाजसेवक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रतिभावंत व्यक्तींना गौरविण्यात येणार आहे. यावर्षीचा आदर्श समाजसेवक पुरस्कार श्री संतोष अच्युतराव पवार, आदर्श शिक्षिका पुरस्कार श्रीमती रंजना नाथराव जाधव, आदर्श समाजरक्षक पुरस्कार श्री मंगेश मारुती भोले, झिरो टू हिरो उद्योजकरत्न पुरस्कार श्री नरहरी राजेंद्र तपकिरे, आदर्श पत्रकार पुरस्कार श्री गोविंद राजाराम जाधव यांना जाहीर करण्यात आला आहे या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठलराव लहाने व महाराष्ट्राचे लाडके सुप्रसिद्ध मराठी अभिनेते मा.सुनील गोडबोले आवर्जून उपस्थित राहणार आहेत, त्याप्रसंगी प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठलराव लहाने यांचे व्याख्यान होणार आहे तसेच पुरस्कारार्थींच्या प्रेरणादायी कार्यावर विशेष प्रकाश टाकण्यात येणार आहे. समाजात सकारात्मक बदल घडवणाऱ्या या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी मनोहर अंबानगरितील सुजाण, सुसंकृत नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग सोपानराव ढगे, उपाध्यक्ष जी.डी. बनसोडे तसेच सचिव मिलिंद ढगे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## हत्येचा प्रयत्न करणे व बेकायदेशीर शस्त्र बाळगणे या गुन्ह्यातून आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

बीड | प्रतिनिधी

दिनांक १९-०६-२०२४ रोजी रात्री १०.०० वा. च्या सुमारास प्रकाश आंबेडकर नगर इमामपूर रोड लगतच्या पत्र्याच्या शेडसमोर आरोपी नामे सनी आठवले व इतर नऊ जण आले व फिर्यादी अभिषेक विश्वास डोंगरे यांच्या जबाबा प्रमाणे सनी आठवले यांने शिवीगाळ करून त्याच्या जवळील पिस्टल काढून डोक्यास लावली व तुला गोळ्या घालून जिवे मारून टाकतो अशी धमकी दिली तेव्हा सनी आठवले यांनी त्याच्या हातातील कुकरीने जीवे मारण्याच्या



उद्देशाने फिर्यादीच्या पोटावर वार केला व गंभीर जखमी केले व प्रसाद धिवार यांने त्याच्या हातातील तलवारीने जिवे मारण्याच्या उद्देशाने हातावर वार केला.

त्यामुळे हातावर गंभीर दुखापत झाली व भांडण सोडवण्यास फिर्यादीचे नातेवाईक आले असता मनीष क्षिरसागर, मोतीराम धिवार, योगेश वाघमारे, सुरज जाधव, गणेश माने यांनी हातातील लोखंडी पाईप, काठी, लोखंडी गजाने मारून मुक्कामार दिला व पूजा धिवार हिने फिर्यादीची चुलती उषा यानां चाप्पाट बुक्क्याने मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली अशी फिर्याद पेठ पोलीस स्टेशन, बीड येथे भा.द.वी कलम ३०७, ३२३, १४९, १४८, १४७, १४३, ५०४, ५०६ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम १३५ व शस्त्र अधिनियम १९५९ कलम ३,४,२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

याप्रकरणी आरोपी क्र.६ योगेश बद्री वाघमारे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज माननीय जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे दाखल करण्यात आला तसेच या प्रकरणात मा. न्यायालयासमोर ॲड.दीपक ससाने यांनी युक्तिवाद केला व ड.अजित ओव्हाळ यांनी सहकार्य करून आरोपीच्या वतीने भक्कमपणे बाजू मांडली व सदर प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर केला.

## धारुर ग्रामीण रूग्णालयाच्या रस्त्याची दुरावस्था; लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

धारुर | प्रतिनिधी

धारूर शहरातील ग्रामिण रूग्णालयाकडे जाणार्या रस्त्याची अतिशय दुरावस्था झालेली असुन जागोजागी खड्डे पडलेले आहेत. मध्येच नालिचे पाणी ठिक ठिकाणी रस्त्यावरच सोडलेले असुन वाहन चालवणे अवघड झालेले आहे. रुग्णालय म्हटले कि सिरियस पेशंट असणारच या रस्त्यावरून हे पेशंट नेहणे जोखमिचे बनले असुन वाहन चालकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. काही वेळातर पेशंट घेऊन जाणार्यांनाच दुचाकी घसरून अपघात झाल्याने रुग्णालयात भरती करावे लागले आहे.



गोपाळपुर ग्रामपंचायत अंतर्गत हे रूग्णालय येत असल्यामुळे नगर परिषद धारूर याकडे डोळेझाक करत असुन मा. आमदारांना सुध्दा आपल्या आमदार फंडातून हा रस्ता व्हावा असे वाटत नाही असेच दिसुन येत आहे. लोकप्रतिनिधी तर नुसते नावालाच असल्याचे बोलले जाते. मेलेल्या माणसांच्या स्मशान भुमी, कब्रस्थान साठी लोखो रुपयेचा निधी खर्च केला गेला, तळ्याचे शुशोभिकरण करण्यासाठी करोडो खर्च केला पण ज्या रस्त्यामुळे स्मशानभुमीत जाण्यापासुन वाचवता येईल त्या रस्त्यासाठी निधी उपलब्ध होत नाही ही शहराची शोकांतिका आहे असेच सुजाण नागरिक आपले मत व्यक्त करत आहेत.

## अपहरण करुन खुनाचा प्रयत्न करणाऱ्याला ठोकल्या बेड्या

गेवराई | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीचा आढावा घेतला असता. बऱ्याच गुन्ह्यामधील आरोपी हे गुन्हा केल्यानंतर पळुन जातात. व पोलीसांना मिळुन येत नाहीत. त्यामुळे बीड जिल्ह्यामधील गुन्हा दाखल झालेल्या आरोपीची माहीती काढुन पकडण्यासाठी वरीष्ठांनी आदेश दिल्याने पोलीस ठाणे पिंपळनेर येथे (दि.१३.०३.२०२५) रोजी ओमकार ज्ञानोबा सातपुते यांच्या फिर्यादीवरुन दादासाहेब खिंडकर व इतर ७ आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद झाला होता. या गुन्ह्यातील आरोपी दादासाहेब खिंडकर हा पोलीसांना शरण आला होता. परंतु इतर आरोपी हे पळुन गेलेले होते. त्या पळुन गेलेल्या आरोपींपैकी एक आरोपी योगेश उर्फ खोन्या बाबासाहेब चव्हाण (रा. रानमळा, खांडवी ता.गेवराई) हा कारागृहा जवळ थांबलेला असल्याची गुप्त बातमीदारामार्फत स्थानिक गुन्हे शाखेला माहीती मिळाल्याने पथकाने सदरील ठिकाणी त्याला झडप मारुन पकडले, व पोलीस ठाणे पिंपळनेर यांचे ताब्यात पुढील तपासकामी देण्यात आले आहे.

सदरील कारवाई ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, विष्णु सानप, चालक नितीन वडमारे यांनी केली आहे.

# नवीन रेल्वे, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांना गती द्या

## खा.बजरंग सोनवणे यांच्या मुंबईतील बैठकीत अधिकाऱ्यांना सुचना, दोन्ही विभागाकडून घेतला आढावा

केज । प्रतिनिधी

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग, धाराशिव-बीड- छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी देण्यात आला असून सर्व्हेक्षणाच्या कामाला गती द्या, राष्ट्रीय महामार्गाचे अर्धवट असलेली कामे तातडीने पुर्ण करा, नवीन दोन रस्ते दर्जोन्नत करुन राष्ट्रीय महामार्ग करावेत अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी दिल्या. दि.१७ मार्च रोजी दिल्ली येथील संसदेत बीड रेल्वे जंक्शन व रेलमार्ग कामांना गती देण्यासाठी आवाज उठविला होता. यानंतर दि.१८ रोजी सरव्यवस्थापक कार्यालय सीएसटी मुंबई येथे खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.



### या मार्गांना दर्जोन्नतीचा प्रस्ताव

पिंड्डी-लिंबादेवी-गारमाथा-अंमळनेर-धामनगाव- टाकळी काझी,? तर दुसरा उमापूर फाटा ते उमापूर-शेवगाव या दोन मार्गांना दर्जोन्नती करणे, या विषयावर बैठकीत चर्चा झाली असून या कामासाठी अधिकाऱ्यांनी सदरील प्रक्रिया राबविण्यास सुरूवात करू, असे म्हटले. दोन्ही मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते.

### धारूर घाटावर फोकस

धारूर घाटात अनेक अपघात होऊन प्रवाशांचे बळी गेलेले आहेत. सदरील घाटाचे काम व्हावे यासाठी खा.बजरंग सोनवणे वारंवार पाठपुरावा करत असून या घाटासाठी पर्यायी मार्ग कामाला मंजूरी मिळालेली असून तातडीने निवीदा प्रक्रिया पुर्ण करावी आणि कामाला सुरूवात करून काम पुर्ण करावे, याबाबतही अधिकाऱ्यांना बैठकीत सुचना दिल्या.

बैठकीला सरव्यवस्थापक धरमवीर मीना, एस.एस.गुप्ता, ए.के.पांडे, सीपीआरओ स्वप्नील निला, डीजीएम के.के.मिश्रा यांची उपस्थिती होती. यावेळी अश्विनी वैष्णव यांनी धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी दिला असून आता तातडीने सर्व्हेक्षणाचे काम सुरू करावे, अहिल्यानगर- बीड- परळी रेल्वेचे काम सुरू आहे.आता अहिल्यानगर ते बीडपर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी झालेली आहे. तर पुढील कामाला गती देऊन लवकरात लवकर परळी पर्यंतचे काम पुर्ण करावे, अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामामुळे काकडवाडी, सोलापूर वाडी, धानोरा, कडा, कारेगाव, विघनवाडी, हिवरसिंगा, चऱ्हाटा, ढोलेवस्ती आणि इतर ठिकाणी सडक वाहतूक बाधित झाली आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, वृद्ध आणि प्रवाशांना अडचणी येत आहेत. यासाठी या ठिकाणी तसेच बीड-परळी मार्गावरील आवश्यक ठिकाणी पुल बांधण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कार्यवाही करावी अशा सुचना दिल्या तर राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या बैठकीत केंद्रीय दळणवळण विभागाचे विभागीय अधिकारी प्रशांत फेगडे यांचेसह राष्ट्रीय महामार्ग विभागाचे सर्व मुख्य अभियंते, कार्यकारी अभियंते व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी अहमदपूर- धायगुडा -पिंपळा अंबाजोगाई-लोखंडी सावरगाव-केज- मांजरसुंभा या मार्गाला दुहेरी राष्ट्रीय महामार्ग करणे, लातूर-बर्दापूर- लोखंडी सावरगाव या मार्गासही दुहेरी मार्ग करणे,परतूर-माजलगाव-धारूर-केज- कळंब- येरमाळा-कुसळंब या मार्गातील अर्धवट कामे पुर्ण करणे,खरवंडी- आर्वी- ब्र.येळंब- न. राजुरी-बीड-वडवणी- परळी रस्ता पूर्ण करुन सुधारणा करणे, मांजरसुंबा ते चुंबळीफाटा मार्गातील अडथळे योग्य त्या उपाययोजना पुर्ण करून काम पुर्ण करणे, पैठण-पंढरपूर रा.मा. मधील मळेकरवाडी घाटामधे तातडीने डांबरीकरण करणे, चुंभळी व पाटोदा येथील अडथळे दूर करुन कामे पूर्ण करणे आदि विषया वर सविस्तर चर्चा झाली.

# नाभिक सखी सन्मान पुरस्कार सोहळा

## सोहळ्यास उपस्थित राहावे : जिल्हाउपाध्यक्ष शामराव राऊत

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र नाभिक महामंडळ बीड जिल्ह्याच्या वतीने नाभिक समाजातील कर्तृत्वान महिला तसेच सामाजिक, राजकीय शैक्षणिक, आदर्श माता अशा विविध अंगाने उत्कृष्ट कार्य असणाऱ्या नाभिक समाजातील भगिनींचा नाभिक सखी सन्मान पुरस्कार सत्कार करण्यात येणार आहे.



या कार्यक्रम चे आयोजन दिनांक २१/३/२०२५ वार शुक्रवार सकाळी ११.३० रोजी जनशिक्षण संस्था चक्रधर नगर बीड या ठिकाणी पुरस्काराच्या वितरणाचा कार्यक्रम ठेवला आहे. या पुरस्कार वितरण सोहळयासाठी मुख्य आकर्षण सौ अंजली धानोरकर उपजिल्हाधिकारी संभाजीनगर बीड यांची उपस्थिती असणार यांच्या शुभहस्ते या पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळ जिल्हा उपाध्यक्ष शामराव राऊत यांनी केले आहे.



आमचे नेते आमदार मा.पंकजभाऊ भुजबळ यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत.

# विरोधकांकडून खिल्ली, आता मात्र स्वागत

केज । प्रतिनिधी

खा. बजरंग सोनवणेंनी पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे डीपीसीच्या बैठकीत विमानतळाची मागणी केली होती. दि.३० जानेवारी २०२५ रोजी पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बीड येथे झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खा. बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यासाठी विमानतळ करावे, असा ठराव मांडला होता. यावेळी पालकमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दर्शवला होता. मात्र, विरोधकांनी सोशल मिडीयावर या मागणीची खिल्ली उडविली होती. दरम्यान, दि. १७ मार्च रोजी विधीमंडळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड विमानतळ उभारण्याचा निर्णय जाहिर केला.



यानंतर मात्र विरोधकांकडून या निर्णयाचे स्वागत होताना दिसत आहे. श्रेयासाठी याला त्याला नावे ठेवू नका आपले सर्व लोकप्रतिनिधी आपापली जबाबदारी चांगल्या प्रकारे ओळखून आहेत. जो तो लोकप्रतिनिधी ज्याच्या त्याच्या परीने जिल्ह्याच्या विकासात योगदान देत आहे. व सर्वांनी द्यायला देखील पाहिजे लोकसभेत बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी बीड येथे विमानतळ करावे ही मागणी केली होती. त्यावेळेस बऱ्याच जणांनी विशेषतः बीड जिल्ह्यातीलच असलेल्यांनी टिंगल टवाळी करत अपमान करण्याचा प्रयत्न केला मात्र बजरंग बप्पा थांबले नाहीत.

केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून त्यांनी बीडच्या आजूबाजूला दोन ठिकाणी विमानतळ होऊ शकते अशा जागा देखील सुचवल्या व त्या पद्धतीने केंद्र सरकारकडून विचारणा देखील झालेली आहे. यामध्ये आता उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी आज याबद्दल घोषणा केली. त्याची सुरुवात खासदार बजरंग बप्पानीच केलेली आहे.

# धारूरचे भूमिपुत्र ठाकूर सुजितसिंह दिख्खत युवा उद्योजक पुरस्काराने सन्मानित

धारूर । प्रतिनिधी

धारूर शहराचे भूमिपुत्र आंबेजोगाई येथे व्यवसाय करणारे ठाकूर सुजितसिंह दिख्खत यांना युवा उद्योजक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.



धारूर शहरातील दिख्खत परिवारातील तरुण उद्योजक ठाकूर सुजितसिंह दिख्खत यांना एका दैनिकाने युवा उद्योजक पुरस्काराने सन्मानित केले आहे. अंबाजोगाई येथे त्यांनी उद्योग उभारून व्यवसायाला चालना दिली आहे अनेकांना रोजगार देऊन चांगले कार्य केले आहे. त्यांच्या या व्यवसायाची दखल घेऊन आंबेजोगाई येथील एका दैनिकाने त्यांना युवा उद्योजक पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ स्वरुपसिंह हजारी, ठाकूर उदयसिंह दिख्खत, ठाकूर विजयसिंह दिख्खत, जिजा सिरसट, पत्रकार बांधव इत्यादींनी अभिनंदन केले आहे.

# आपण सर्वांनी जबाबदारीने पाणी वापरले तरच भविष्यातील पिढ्यांना पाणी मिळेल : ढाकणे

बीड । प्रतिनिधी

राज्यात १६ मार्च ते २२ मार्च दरम्यान साजरा केला जातो. जलजागृती सप्ताह या निमित्ताने आपणही पाणी जपून वापरले पाहिजे, असे मत बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले. पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीसाठी पाणी अनिवार्य आहे. मानव, प्राणी, वनस्पती आणि संपूर्ण पर्यावरणाच्या संतुलनासाठी पाण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

मानवी आरोग्यासाठी आवश्यक – शरीरातील सर्व क्रियांसाठी पाणी आवश्यक आहे. निर्जलीकरण टाळण्यासाठी आणि आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी पुरेसं पाणी पिणं गरजेचं आहे. अन्न उत्पादनासाठी पाणी महत्त्वाचे – शेतीसाठी पाणी



अत्यंत महत्त्वाचे आहे. पाण्याच्या अभावामुळे अन्नधान्य उत्पादनावर मोठा परिणाम होतो. उद्योग आणि ऊर्जा निर्मिती – अनेक उद्योगांमध्ये आणि वीज निर्मितीसाठी पाणी लागते. जलविद्युत प्रकल्प हे ऊर्जा निर्मितीचे मोठे स्रोत आहेत. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आवश्यक – नद्या, सरोवरे, भूजल आणि समुद्र यांचा परिसंस्थेच्या संतुलनात मोठा वाटा आहे. पाण्याची नासाडी टाळा आणि आवश्यकता असल्यासच वापरा. गळणाऱ्या नळांची दुरुस्ती करा आणि पाणी साठवून ठेवा. पाण्याचा पुनर्वापर करा, जसे की भांडी धुतलेल्या पाण्याचा झाडांना उपयोग करा. झाडे लावा आणि जंगलतोड रोखा, कारण वृक्ष भूगर्भातील पाण्याची पातळी टिकवतात. आपल्या शिवारात जल संधारण करून भूगर्भातील जलसाठा वाढवा. जर आपण सर्वांनी जबाबदारीने पाणी वापरले तर भविष्यातील पिढ्यांसाठी पाणी टिकवता येईल. पाणी आहे तरच आपले जीवन आहे! असे मत जलप्रेमी बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले.



श्रीक्षेत्र सासुरा येथे सप्ताह प्रसंगी वडमाऊली विद्या प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेचे सचिव व युवक नेतृत्व माननीय शरद गदळे यांना जवळ बोलावून पाठीवर प्रेमाची थाप टाकून आस्थेवाईक पणे चौकशी करताना नंदकिशोर जी मुंदडा काकाजी जेष्ठ नेते भारतीय जनता पार्टी.
(छायाचित्र तात्यासाहेब डोईफोडे)

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी शेतकरी सहवेदना दिवस

लिंबागणेश । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हि राष्ट्रीय आपत्ती असुन आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी सिलिंग, आवश्यक वस्तु, जमीन अधिग्रहण कायदे रद्द करण्यात यावेत या प्रमुख मागणीसह यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे, मालतीताई करपे यांनी १९ मार्च १९८६ रोजी आर्थिक विवंचनेतुन आपल्या ४ लहान मुलांसह सामुहिक आत्महत्या केली होती. या सामुहिक आत्महत्येची शासन दरबारी पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद झाली. या घटनेला यावर्षी ३९ वर्षे पूर्ण झाली आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड पोलिसांच्या माहितीनुसार देशभरात दररोज सुमारे ४५ शेतकरी आत्महत्या करतात. तर महाराष्ट्रात दररोज सुमारे




१५ शेतकरी आत्महत्या करून मृत्युला कवटाळतात. बीड जिल्ह्यात २०१४ ते २०२४ या १० वर्षाच्या कालावधीत २४३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवन संपवले आहे.

८ वर्षांपासून १९ मार्च २०१९ पासुन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राज्यातील आणि देशातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी दरवर्षी १९ मार्च रोजी अन्नदात्यासाठी एक दिवस उपवास करून शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाविरोधात प्रभावी संदेश देण्यासाठी शेतकरी आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी कायदे रद्द रद्द करण्यात यावेत. प्रशासनाच्या निष्क्रियतेला जाब विचारण्यासाठी, शेतकऱ्यांचे हक्क व अस्तित्व वाचवण्यासाठी एल्गार करण्याच्या उद्देशाने संवेदनशील नागरीकांनी एक दिवसाचा कडकडीत उपवास करत आपल्या सहवेदनेचा, पाठिंब्याचा आणि आंदोलनाच्या जाज्वल्य हेतुचा जागर करण्यासाठी अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक उपवास, सामुहिक उपोषण, श्रद्धांजली सभा आदिंचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले असुन या आवाहनाला प्रतिसाद देत किसानपुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१९ बुधवार रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सामुहिकरीत्या एक दिवस अन्नत्याग आंदोलन करत आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी शेतकरी सहवेदना दिवस पाळण्यात आला.

यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे, अँड.गणेश वाणी, भगवान मोरे, रामकिसन गिरे, पांडुरंग वाणी, रामचंद्र मुळे, आश्रुबा गिरे, राजेंद्र वायभट, साहेबराव निर्मळ, महादेव ढास, संतोष भोसले, संजय सुकाळे, पत्रकार हरीओम क्षीरसागर आदी सहभागी झाले होते.

# कोमलवाडी येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई

## पुढाऱ्यांनो, राजकारण बाजूला ठेवून नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवणे गरजेचे!



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील कोमलवाडी येथे उन्हाळ्याची चाहूल लागताच पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. गावातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकायची वेळ येते की काय? शिवाय वेळप्रसंगी पाणी विकत घ्यावे लागणार की काय? अशी चिंता नागरिकांमध्ये निर्माण होताना दिसत आहे. परिससरातील विहिरी, तलाव कोरडे पडले आहेत. गावाला पाणी पुरवठा करणार्या शासकीय विहिरीचे पाणी तळाला जाऊन ठेपले आहे. त्यामुळे तेथील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे.

### पाणीटंचाई गंभीर; नागरिकांना करावा लागतोय, पाणीटंचाईचा सामना!

कोमलवाडीत आजही पाण्याचे दुर्भिक्ष्य कायम आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने रहिवाशी बेजार झाले आहेत. ग्रामपंचायत व सत्ताधारी विरोधी पक्ष गावपुढारी यांच्या मार्फत मूलभूत सेवांच्या बाबतीत सुखाचे दिवस येतील, अपेक्षा आहे. मात्र एकही ठोस काम करण्यात गाव पुढाऱ्यांना म्हणावं तसं यश येत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सध्याच्या परिस्थितीत भीषण पाणीटंचाई आहे. यामुळे स्थानिक रहिवाशी हवालदिल झाले आहेत. गाव पुढाऱ्यांना दिसतंय पण सुचंत नाहीं पाणीटंचाई गंभीर; गाव पुढारी गप्प का बसले? यावर आवाज का उठवत नाहीत असा सवाल गावातील नागरिक करत आहेत.

### पाणीटंचाईवर गाव पुढारी बोलणार का? सर्वांचे लागले लक्ष!

सध्याच्या परिस्थितीत आठवड्यातून एकदा पाणी येत आहे. आतापासूनच जर आठवड्यातून एकदा पाणी मिळत असेल तर, आगामी काळात हे चित्र अधिक भीषण होण्याची शक्यता आहे. परंतु यावर एकही गाव पुढारी बोलायला तयार नाही किंवा आवाज उठवायला तयार नाहीत. गाव पुढाऱ्यांना फक्त मतदानच्या वेळीच गावातील नागरिक किंवा गाव आठवतं का? असा प्रश्न यानिमित्त उपस्थित केला जात आहे. दरम्यानच्या, काळात कोमलवाडी गावाला पाणी पुरवठा करणार्या कोमलवाडी परिसरातील तलावाच्या पायथ्याशी असलेल्या शासकीय विहिरीचे पाणी एकदमच कमी झाले. त्यामुळे कोमलवाडी गावाला आठवड्यातून एक वेळेस पिण्याच्या पाण्यासाठी पुरवठा केला जात आहे. यंदाचा उन्हाळा अधिक कडक असणार असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. सरासरी तापमानात सार्वधिक अंशाने वाढ होण्याची शक्यता वर्तविली आहे. साहजिकच पाण्याची भीषण टंचाई निर्माण होण्याचे संकेत असताना. गाव पुढारी मात्र सुस्त असल्याचे दिसून येत आहे. उन्हाच्या झळा वाढत चालल्या आहेत. कोमलवाडी गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. मात्र, ही बाब गाव पुढारी व प्रशासनाने अद्याप गांभिर्याने घेतली नसल्याचे दिसून येत आहे.

पाणी टंचाईचे निवारणार्थ नियोजन करण्याची गरज असताना अद्याप एकही बैठक घेतलेली नाही. पाणी समस्या गंभीर बनल्यानंतरच गावच्या पुढाऱ्याला जाग येणार का, असा सवाल उपस्थित झाला आहे. कोमलवाडी गावचे सत्ताधारी पुढारी –विरोधीपक्ष पूर्णपणे अपयशी ठरल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळेच या गावांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. मार्चपासूनच अनेक गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. गावांसह शहरातील जनतेलाही नाथसागरचा आधार घ्यावा लागत आहे. एप्रिल आणि मे या कडक उन्हाच्या महिन्यांत परिस्थिती गंभीर होणार आहे. त्यामुळे, पाण्याची समस्या दूर करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. सध्या गेवराई तालुक्यातील अनेक गावांना पाणी समस्या आहे. काही ठिकाणी विहिरी आधारे पाणी समस्येवर मात करण्यात येत आहे. मात्र, या विहिरीत पाणी कमी झाल्यानंतर पुढे काय, अशी स्थिती आहे. अनेक गावातील कूपनलिका नादुरुस्त झाल्या आहेत. अनेक विहिरींचे पाणीही कमी झाले आहे. त्यामुळे, पाणी समस्या गंभीर बनण्याची चिन्हे आहेत.



# आकाश बनसोडे हत्या प्रकरण व इतर मागण्या संदर्भात उपजिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने : लोक जनशक्ती पार्टी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र सध्या जातीय व धार्मिक द्वेषाने अस्थिर होत आहे सद्या कडा आष्टी येथे जातीय द्वेषातून आकाश बनसोडे या तरुणाची निर्गुण हत्या करण्यात आली तसेच मुस्लिम विरुद्ध सतत धार्मिक गरळ ओखण्याचे काम सरकारमधील काही मंत्री करत असून नागपूर दंगल घडविण्यात ते कारणीभूत आहेत यातच कॅबिनेट मंत्री असलेले नितेश राणे यांनी मोठी गरड ओखून महाराष्ट्र अस्थिर करून दंगल पेटवल्याचे प्रामुख्याने दिसत आहे तसेच महाराष्ट्राच्या समाजिक न्याय विभागाचे ७००० कोटी रुपये इतर विभागाला देऊन दलित आणि आदिवासी यांचा जो हक्काचा आणि विकासाचा मार्ग होता तो बंद करण्याचा घाट सत्ताधाऱ्यांनी घातल्याचा दिसत आहे त्याचा आम्ही जाहीर निषेध करून त्याचाच जाहीर निषेध आंबेजोगाईत मोठ्या प्रमाणात आज आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र सरकार लढे आणि चळवळी दडपण्यासाठी जन सुरक्षा कायदा हा ब्रिटिश सरकारच्या धर्तीवर राज्य सरकार आणत आहे आणि सामान्य माणसांचा मूलभूत अधिकार हिरावून घेत आहेत आणि त्यांच्या प्रश्नांवर आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचा हक्क हिरावून घेत आहे याचा आम्ही तीव्र निषेध करून महाराष्ट्रातील सर्व जनतेने या जनसुरक्षा कायद्याला तीव्र विरोध करून आपले मूलभूत हक्क आबादीत ठेवण्यासाठी सजग राहावे आणि विरोध करावा तसेच राज्यातील गायरान जमिनीवरील जे जमिनी वाहत आहेत त्या गायरान जमिनीवर राज्य सरकार ऊर्जा प्रकल्पांना व इतर उद्योगांना तिथे जागा देऊन जमिनी बळकावण्याचा प्रयत्न करत आहेत सरकारचा हा कुटील डाव हाणून पाडण्यासाठी अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदन देऊन निदर्शने करण्यात आले. त्या गायरान जमिनी कसणाऱ्या लोकांच्या नावे करण्यात याव्या अशा अनेक मागण्या घेऊन उपजिल्हाधिकारी कार्यालयावर अंबाजोगाई येथे आंदोलन करण्यात आले.

यावेळी कॉम्रेड बब्रुवान पोटभरे, भीमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भीमराव सरवदे, लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे, अक्षय भुंबे, धी राष्ट्रपाल बीड जिल्हा संघटक भीमशक्ती, लोक जनशक्ती पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे, हमीद चौधरी, आदित्य चौरे, गंगाधर पोळ, अजहर सय्यद, कैलास मस्के, सागर निरगुडे, नानवटे भीमशक्ती तालुकाध्यक्ष अंबाजोगाई सुमित आवाडे, शुभम तरकसे, संकेत तरकसे, बादल तरकसे, अक्षय केंद्रे, शुभम केंद्रे, सुनील खोडवे, गणेश मुंडे, विलास पवार, संतोष पवार, रमेश पवार, सैनी पवार आदी उपस्थित होते.



# मिलन नाईट नावाचा मटका जुगारावर माजलगाव शहर पोलिसांचा छापा

माजलगाव । प्रतिनिधी

दि.१८ मार्च २०२५ रोजी गुपनिय माहितीच्या आधारे माजलगाव शहर पोलिसांनी माजलगाव शहरातील जुना मोंढा परिसरातील चाऊस यांच्या घरासमोर काही लोक मिलन नाईट नावाचा मटका व जुगार खेळ चालवीत असल्याची माहिती माजलगाव शहर पोलिसांना एका खबऱ्यामार्फत मिळाली माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांना माहिती मिळताच लागलीच सूर्यतळ यांनी केली. सध्या सर्व मटका कलप वर बंदी असताना सुद्धा चोरून लपून बुक्की चालू आहे. रात्री ८:२३ वा. छापा मारून तिथे मटका जुगार खेळणाऱ्या इसमास रंगे हाथ पकडण्यात आले नामे जुगार घेणाऱ्या आरोपीचे नाव धम्मपाल भाऊराव सातपुते रा.भीम नगर माजलगाव यास पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून नगदी रुपये मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकूण ४०२२०, रुपयाचे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मटका जुगार खेळवणारा व गुप्पीत जुगार चालणारा धम्मपाल भाऊराव सातपुते यांना रंगे हाथ पकडले आहे. सलीम शेख, आसेफ शेख रा. आझाद नगर माजलगाव, इरशाद शेख रा. माजलगाव यांच्याविरुद्ध गु.र.न.१११/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. सदरील कारवाई नवनीत कावत पोलीस अधीक्षक बीड श्रीमती चेतना तिडके अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई मिरज राजगुरू पोलीस उपाधीक्षक उपविभागीय गेवराई अति पदभार माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक के.बी. मागणे, पोहवा/माधव तोटेवाड यांनी केली आहे.

# युटर्नची बातमी प्रकाशित होताच एचपीएम कंपनी लागली कामाला



केज । प्रतिनिधी

केज शहरात अंबेजोगाई–मांजरसुंभा महामार्गावर पिसाटी नदी पूल ते मधूबन हॉटेल पर्यंतच्या रस्ता दुभाजकावर असलेले यूटर्न सिमेंटने भरले नसल्याने या यू टर्न वर धोकेदायक कटाव निर्माण झाल्याने दुचाकी व इतर छोटी वाहने वळण घेताना अपघातग्रस्त होत होते. विद्यार्थी, महिलांना अशा यू टर्न वरून रस्ता पार करताना त्रास होत असल्या कारणाने हे कटाव तात्काळ भरण्याबद्दल एच पी एम कंपनीला केज विकास संघर्ष समितीने तोंडी व लेखी विनंती केलेली होती, तसेच १७ मार्च रोजी दै. सायं. आरंभ ने यासंदर्भात बातमी प्रकाशित केली होती. याची दखल घेऊन कंपनीने कामाला सुरूवात केली असून गतीने शहरांतर्गत युटर्नचे कटाव भरण्यात येत आहेत.

# मुलीचा शोध लागत नसल्याने आईचा आत्मदहनाचा इशारा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवत पळवून नेल्याची घटना अंबाजोगाई तालुक्यात घडली असून या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यास गेलेल्या पालकांना युसुफ वडगाव पोलीस स्टेशन येथे जाण्यास अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथून सांगण्यात आले तदनंतर युसुफ वडगाव पोलीस स्टेशन येथे फेब्रुवारी महिन्यात गुन्हा दाखल झाला आहे मात्र एक महिना उलटला तरी याबाबतीत कोणाचाही शोध लागला नाही नातेवाईकांनी पोलिसांकडे विचारपूस केली असता पोलीस उडवा उडवी ची उत्तर देत प्रकरण मिटवण्यास सांगत असल्याचा गंभीर आरोप मुलीच्या नातेवाईकांनी प्रतिनिधीशी बोलताना केला आहे. मुलीचा शोध लागत नाही म्हणून तिच्या आईने गुरुवार दिनांक २० मार्च रोजी युसुफ वडगाव पोलीस स्टेशन समोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

सदरील हकीकत अशी की दि ०५ फेब्रुवारी रोजी दुपारी ०२ वा सुमारास मुलीची आई कुबेफळ ता अंबाजोगाई जि बीड येथे घरी असताना माझा मोबाईल वर माझा भाचा गोपाळ हरिभाऊ काळे याने माझी मुलीस मोबाईल वरून फोन करुन मी तुमची मुलीला घेऊन जात आहे असे म्हणाला त्यानंतर मी माझा भावास फोन करून मुलीस कॉलेजमध्ये जाऊन त्याला बघ असे त्याला सांगितल्यावर दुपारी ०४ वा सुमारास माझ्या भावाने मला फोन करुन सांगितले की साझी मुलगी व तुझी मुलगी या दोघी सकाळी १० वा घरुन कॉलेजला जाते म्हणुन घरुन गेल्या होत्या मी आता कॉलेज मधुन जाऊन पाहीले असता तुझी मुलगी ही कॉलेजमध्ये दिसली नाही पण माझी मुलगी ही कॉलेजमध्ये दिसली व तिने मला सांगितले की कॉलेजमध्ये गेल्यानंतर अंदाजे सकाळी १० वा सुमारास मुलीची आत्या मिरा हरिभाऊ काळे व तिचा मुलगा गोपाळ हे कॉलेजच्या समोर दिसले त्यावेळी ती म्हणाली की तु पुढे जा मी आत्याला बोलुन येते त्यावेळेस थोड्या अंतरावर गेली असता मुलीला तिची आत्या मिरा व तिचा मुलगा गोपाळ याने तुझ्या सोबत माझ्या मुलाला लग्न कारायचे आहे असे सांगुन तिला लग्नाचे अमिष दाखवुन, फुस लावुण चार चाकी वाहनात बसवून घेऊन गेले आहेत असे मला सांगितल्याने मी त्यानंतर कुंबेफळ येथुन निघुन ०६.०० वा सुमारास अंजनपुर येथे गेले व माझ्या भावाची मुलगी भेटली तिने सकाळी आपेगाव येथे झालेला प्रकार मला सांगितला त्यांनतर आम्ही माझी मुलगी हीचा अजनपुर, कोपरा धानोरा गावात तसेच नातेवाईक यांच्या कडे शोध घेतला परंतु माझी मुलगी मिळुन आली नाही.

त्यानंतर दि ०६ फेब्रुवारी २०२५ रोजी मी व माझा मुलगा असे आम्ही आपेगाव येथे कॉलेजमध्ये जाऊन माझ्या मुली बाबत चौकशी केली असता तेथील शिक्षकांनी ती काल दि ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी पेपरला गैरहजर राहीलेली आहे असे आम्हाला सांगितले त्यानंतर आम्ही भावठांना येथे जाऊन मुलीचा शोध घेतला असता ती दिसून आली नाही तसेच तिची आत्या मिरा हरिभाऊ काळे व मिराचा मुलगा गोपाळ हे पण त्यांचे घरी भावठाणा येथे मिळुन आले नाहीत म्हणुन आमची खात्री झाली की माझ्या मुलीला आत्या मिरा हरिभाऊ काळे व तिचा मुलगा गोपाळ रा भावठाणा हेच फुस लावुन पळवून नेले आहे त्यानंतर आजपर्यंत आम्ही आमचे व त्याचे सर्व नातेवाईकांकडे त्यांचा शोध घेतला परंतु तेन मिळून आले नाहीत. तरी दि ०५/०२/२०२५ रोजी १०.०० वा सुमारास माझी मुलगी हीची आत्या मिरा हरिभाऊ काळे व मिरा हीचा मुलगा गोपाळ हरिभाऊ काळे रा भावठाना ता अंबाजोगाई यांनी लग्राचे अमिष दाखवुन जय किसान माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय आपेगाव येथुन चार चाकी वाहनात बसवुन घेऊन गेले आहेत म्हणून माझी त्यांचविरुद्ध तक्रार आहे अशी फिर्याद मुलीच्या आईने दिली आहे. मात्र फिर्याद देऊन एक महिना उलटला तरी पोलीस प्रशासन बघ्याची भूमिका घेत असून उडवा उडवीची उत्तरे देत आहेत व प्रकरण मिटवण्याची भाषा करत असल्या मुळे तसेच काहीही करून मुलगी मिळत नाही पोलीस प्रशासन ही साथ देत नाही या नैराश्येतून मुलीच्या आईने २० मार्च २०२५ रोजी युसुफ वडगाव पोलीस स्टेशन येथे आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT